हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

# ६१

वर्ष ११ वे : अंक ५
ऑगस्ट २०२५

मासिक

# नवस्नेह

स्वागतमूल्य
₹. 20/-




प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# नवस्नेह दिवाळी अंक २०२५ साठी आपल्या संस्थेची जाहिरात द्या !

सन्माननीय महोदय,

कोल्हापूर चित्पावन संघाचे नवस्नेह मासिक अल्पावधीतच लोकप्रिय झाले आहे. नामवंतांच्या साहित्याने नटलेला, विविध अंगांनी सजलेला, संग्राह्य ठेवावा असा हा नवस्नेह दिवाळी अंक ऐन दिवाळीत आपल्या भेटीस येत आहे. जगभरातील कोणालाही पाहता यावा यासाठी आपल्या संस्थेच्या वेबसाईटवर देखील हा अंक प्रदर्शित करण्यात येणार आहे. या आपल्या दिवाळी अंकात तुमच्या उद्योगाची जाहिरात असावी असे आम्हाला मनापासून वाटते. आपणही यास नक्की सहकार्य कराल याची खात्री आहेच. आपल्यासारख्या दानशूर व्यक्तींमुळेच या अंकाला खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त होत आहे. या पत्राद्वारे आम्ही आपल्याला विनंती करत आहोत की, आपली जाहिरात लवकरात लवकर पाठवून मोलाचे सहकार्य करावे. अंकाची तांत्रिक माहिती खालीलप्रमाणे :-

अंकाचा आकार : 1/8 क्राऊन (7" x 10")  मजकूर पाने : अंदाजे 150

जाहिरातीचे दर : कव्हर पान नं. 2 व 3 रंगीत : प्रत्येकी रु. 10 हजार फक्त

| | |
|---|---|
| पूर्ण रंगीत पान : रु. 7,000/- | अर्धे रंगीत पान : रु. 5,000/- |
| पाव रंगीत पान : रु. 3,000/- | कृष्णधवल पूर्ण पान : रु. 2,000/- |
| कृष्णधवनल अर्धे पान : रु. 1,200/- | कृष्णधवल पाव पान : रु. 800/- |
| छोटी जाहिरात : रु. 500/- | सदिच्छा जाहिरात : रु. 200/- |

आपली जाहिरात सोमवार, दि. 15 सप्टेंबर 2025 पर्यंत मिळेल या बेताने पाठवावी.

कळावे, लोभ आहेच, तो वाढावा ही विनंती.

आपले स्नेहांकित,

केदार जोशी (कार्यवाह)  प्रसाद भिडे (उपाध्यक्ष)  मकरंद करंदीकर (अध्यक्ष)

## श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा घरपोच प्रसाद योजना

आपल्या संघाच्या वतीने सोमवार, दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी दाते पंचांगानुसार अष्टमी जागर सोहळा आयोजित केला आहे. सध्याच्या परिस्थितीत अनेक भाविकांना दर्शनासाठी येणे शक्य होत नाही. विशेषत: घरातील ज्येष्ठ मंडळी, लहान मुले, गर्भवती महिला आदि कुटुंब सदस्य इच्छा असूनही येऊ शकत नाहीत. त्यासाठी संघाच्या वतीने श्रींचा प्रसाद आपल्या घरी पोहोचवण्याचा संकल्प केला आहे. यामध्ये हळद-कुंकू, लाडू-फुटाणे आणि सुरक्षित पिशवी यांचा समावेश आहे. आपल्या कुटुंबाच्या कल्याणासाठी देवीपुढे संकल्प केला जाईल. यासाठी आपण गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत नोंदणी केल्यास प्रसाद आपल्या घरी गुरुवार, दि. २ ऑक्टोबर २०२५ पासून ४-५ दिवसांत कुरिअरने घरपोच पाठवला जाईल. याकरिता एका प्रसादासाठी देणगी शुल्क केवळ रु. ३५१/- देण्याची विनंती करीत आहोत. आपण (१) ज्याच्या नावे प्रसाद घरपोच हवा असेल त्याचा संपूर्ण नाव, पत्ता व व्हॉटस्‌अप नंबर आणि (२) गोत्र आणि प्रसादाची संख्या ही माहिती कळवावी. देणगी शुल्क रोखीने संघाच्या कार्यालयाच्या किंवा श्री परशुराम पतसंस्थेच्या कार्यालयात अथवा संघाच्या अधिकृत बँक खात्यात जमा करावेत अथवा क्यू-आर कोड स्कॅन करून भरू शकता.

बँकेचे नाव : बँक ऑफ इंडिया

शाखा : महाद्वार रोड, कोल्हापूर.

खाते नंबर : 090210110016181

IFSC Code : BKID0000902

नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी संपर्क

श्री. संतोष साने : 9459019091

श्री. ऋषिकेश लिमये : 9404260470

आपला,

प्रसाद भिडे (उपाध्यक्ष)  मकरंद करंदीकर (अध्यक्ष)

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ११ वे : अंक ५ : ऑगस्ट २०२५**



- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) **संपादकीय** /४

२) **अति-आधुनिक चिकित्सा व्यवस्था** /५
- वर्षा लाड

३) **पतिव्रता श्रीमंत मस्तानीबाईसाहेब** /७
- जगन्नाथ लडकत

४) **गुरुपौर्णिमा अर्थात व्यास पौर्णिमा** /९
- आंतरजालावरून

५) **ज्ञानसूर्याची सावली** /११ - सौ. मंजुश्री गोखले

६) **ब्राह्मण आणि सरकारी अनुदान** /१६
- श्रीकांत शिंत्रे

७) **सोपानदेवांची अलौकिक सोपानदेवी** /१७
- सौ. मंजुश्री गोखले

८) **मान्यवर सत्कारमूर्तींचे परिचय** /१९

९) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०







हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**

या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. १३ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

यावर्षी पावसानं कमालच केली. मुसळधार मे मध्येच पडून गेला आणि पुढं जो श्रावणाचा ताल त्यानं धरलाय त्यात काही आत्तापर्यंत तरी बदल नाही. पण हा अती पडला तर आता मात्र नकोसा होईल. अर्थात ते आपल्या हातात नाही म्हणा ! आणि 'तो'ही काही आपला चाकर नाही. असं म्हणतात की पंचमहाभूतात पाणी हे भूत सगळ्यात धोकादायक आहे. पृथ्वीजवळ चुकीला क्षमा आहे. क्वचित आकाशाजवळही आहे. अग्नीही कधीकधी क्षमाशील होतो. वाराही तसा क्षमाशीलच. पण पाण्याजवळ मात्र चुकीला क्षमा नाही ! मग त्या भूताचं तो संजीवक प्रतिक आहे. तो का म्हणून आपलं ऐकेल? पडतोयस तर पड बाबा ! असं फक्त आपण म्हणू शकतो. पण आत्ताच त्यानं सगळ्या भारतभरच नव्हे, तर जगभर आपली भयानकता दाखवलीच आहे. तेव्हा त्याला अडवणं मानवाला तरी शक्य नाही. म्हणून म्हटलं, पडतोय तर पडू दे ! नाही का?

मित्रांनो, या अंकात आपल्या एकंदरीत रोजच्या औषधांबद्दल एक टीका-टिप्पणी केलेला लेख आहे. तो तुम्हाला थोडा विचार करायला लावेल. परवा नुकत्याच झालेल्या गुरुपौर्णिमेनिमित्त ज्या व्यास महर्षींच्या नावे आपण ही पौर्णिमा करतो त्या वेद व्यासांवरचा एक अभ्यासपूर्ण लेखही तुम्हाला वाचायला मिळेल. तर दुसरं विशेष म्हणजे अजिंक्य योद्धा बाजीराव पेशवे यांच्यावर उत्कट प्रेम करून अजरामर झालेल्या सौंदर्यवती राणी मस्तानी बाईंवरचाही एक लेख अंकात आहे. तो आपणाला खऱ्या इतिहासाची माहिती देतो.

याचबरोबर आपल्या संघातर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या विशेष गुणगौरव कार्यक्रमातील सत्कार-मूर्तींचा परिचय सुद्धा अंकात दिलेला आहे. त्यामध्ये आपले सगळ्यांचे लाडके श्री. भावेकाकाही आहेत. या सर्व सत्कारमूर्तींचं अभिनंदन !

म्हणजे मित्रांनो, पौराणिक व्यास महर्षी, ऐतिहासिक मस्तानी आणि वर्तमानातला आपल्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आरोग्य असे तीनही काळाला स्पर्श करणारे लेख आपल्या या अंकात आहेत. म्हणूनच तर काही दर्जेदार अंकांत आपल्या नवस्नेहचा उल्लेख येतो.

मंडळी, निसर्गानं आधीच आणला असला तरी कॅलेंडरप्रमाणे आता श्रावण सुरू झाला. मग भाद्रपद. भाद्रपदात येतात गणराज, आपले आराध्य दैवत ! त्याच्या स्वागतासाठी सज्ज असालच ! कारण श्रावण लागला की सणसमारंभ सुरूच होतात. आनंदोत्सव सुरू होतात. यातूनच आशा, इच्छा, प्रयत्न यांच्या मालिकेची सुरुवात होते.

**इन्सान ख्वाईशोंसे बंधा हुआ**
**एक जिद्दी परिंदा है ।**
**उम्मीदोंसे घायल तो है पर,**
**उम्मीदोंपरही जिंदा है ।**

तेव्हा नवीन आशा, उत्साह, उल्हास घेऊन आलेल्या या श्रावणाचं, या सणाचं स्वागत करूया. दुःखाचे, निराशेचे ढग बाजूला सारून सुखाचं इंद्रधनू बघूया ! या सर्व सणांच्या आणि गणेश उत्सवाच्या तुम्हा सर्वांना अनंत अनंत शुभेच्छा !

दिवाळी अंकासाठी लेख पाठवायचं तेवढं विसरू नका ! धन्यवाद !


आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००


**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# अति-आधुनिक चिकित्सा व्यवस्था !

दोन-तीन दिवस ताप होता, औषधं घेतली नसती तरी बरे झालो असतो, शरीर आपोआप काही दिवसांत बरे झाले असते. पण तुम्ही डॉक्टरकडे गेलात. डॉक्टरसाहेबांनी सुरुवातीलाच भरपूर टेस्ट्स लिहून दिल्या. टेस्ट रिपोर्टमध्ये तापाचं काही ठोस कारण सापडलं नाही, पण cholesterol आणि blood sugar थोडं वाढलेलं आढळलं, जे सामान्य माणसांत थोडं फार कमी-जास्त होणं ही सामान्य गोष्ट आहे.

ताप तर गेला, पण आता तुम्ही तापाचे रुग्ण राहिला नाही. डॉक्टरसाहेब म्हणाले - तुमचं cholesterol जास्त आहे आणि sugar थोडं जास्त आहे, म्हणजे तुम्ही 'pre-diabetic' आहात. आता तुम्हाला cholesterol आणि blood sugar नियंत्रणात ठेवण्यासाठी औषधं घ्यावी लागतील. यासोबत खाण्यापिण्यावर अनेक बंधनं घालण्यात आली. तुम्ही खाण्यावर बंधनं घातली नसतील, पण औषधं मात्र नियमित घेतली.

असे तीन महिने गेले. परत टेस्ट केली. cholesterol थोडं कमी झालं, पण आता blood pressure थोडं वाढलेलं आढळलं. ते नियंत्रणात आणण्यासाठी अजून एक औषध दिलं गेलं. आता तुमची औषधांची संख्या झाली २.

हे ऐकून तुमचं tension वाढलं. आता काय होणार? - ह्या चिंतेने तुमची झोप उडाली. डॉक्टरांनी झोपेसाठी औषधही सुरू केलं. आता औषधं झाली ३.

इतकी औषधं घेतल्यामुळे आता तुम्हाला पोटात जळजळ होऊ लागली. डॉक्टर म्हणाले - जेवणाआधी एक gas ची गोळी घ्या. औषधं वाढून झाली ४.

असेच सहा महिने गेले. एक दिवस छातीत दुखायला लागलं म्हणून तुम्ही emergency मध्ये धाव घेतली. डॉक्टरांनी सर्व तपासण्या केल्या आणि सांगितलं - वेळेवर आलात, नाहीतर मोठा प्रसंग घडला असता. मग काही खास तपासण्या सुचवण्यात आल्या ५.

अनेक महागड्या टेस्ट्सनंतर डॉक्टर म्हणाले - जुनी औषधं सुरूच राहतील, आता heart साठी अजून दोन औषधं घ्यावी लागतील. आणि तुम्हाला एक endocrinologist (hormone specialist) कडेही जावं लागेल. आता तुमची औषधं झाली ७.

Heart specialist च्या सांगण्यानुसार तुम्ही endocrinologist कडे गेला. त्यांनी sugar साठी अजून एक औषध आणि thyroid थोडं वाढलेलं असल्यामुळे अजून एक औषध दिलं. आता तुमची एकूण औषधं झाली ९.

आता तुम्ही मनाशी मान्य करू लागलात की तुम्ही खूप आजारी आहात - heart चे रुग्ण, sugar चे रुग्ण, insomnia चे रुग्ण, gastritis चे रुग्ण, thyroid चे रुग्ण, kidney चे रुग्ण वगैरे वगैरे...

तुम्हाला हे सांगितलं गेलं नाही की तुम्ही तुमचं willpower, आत्मबल आणि lifestyle सुधारून आरोग्य मिळवू शकता. उलट तुम्हाला वारंवार हे सांगितलं गेलं की तुम्ही गंभीर रुग्ण आहात, अशक्त आहात, असमर्थ आहात, तुटलेली व्यक्ती आहात!

असेच आणखी सहा महिने गेले. औषधांच्या side effects मुळे तुम्हाला लघवीच्या काही समस्या आल्या. मग रूटीन तपासणीत कळलं की तुमच्या kidney मध्ये काही समस्या आहे. डॉक्टरांनी पुन्हा अनेक टेस्ट्स केल्या.

Reports पाहून डॉक्टर म्हणाले -

Creatinine थोडं वाढलेलं आहे, पण औषधं नियमित घेत राहिल्यास काळजीची गरज नाही. आणि अजून दोन औषधं सुरू केली.

आता तुमची एकूण औषधं झाली ११.

आता तुम्ही जेवणापेक्षा जास्त औषधं घेत आहात, आणि औषधांच्या अनेक दुष्परिणामांमुळे हळूहळू मृत्यूच्या दिशेने वाटचाल करत आहात!!

ज्यामुळे सुरुवातीला तुम्ही डॉक्टरकडे गेला – जर डॉक्टरसाहेबांनी म्हटलं असतं – काळजीचं काही कारण नाही. हा सामान्य ताप आहे, काही औषधांची गरज नाही. काही दिवस विश्रांती घ्या, भरपूर पाणी प्या, ताजं फळ-भाजी खा, सकाळी चालायला जा – एवढंच पुरेसं आहे. औषधांची काही गरज नाही.

तर मग डॉक्टरसाहेब आणि औषध कंपन्यांचं पोट कसं भरलं असतं? आणि सर्वात मोठा प्रश्न – कोणत्या आधारावर डॉक्टर रुग्णांना cholesterol, high BP, diabetes, heart disease आणि kidney disease घोषित करत आहेत?

**हे standards कोण ठरवतंय?– चला, थोडं विस्ताराने पाहू –**

- १९७९ मध्ये blood sugar 200 mg/dl पेक्षा जास्त असेल, तेव्हाच एखाद्याला diabetic मानलं जायचं. त्या वेळी जगाच्या फक्त ३.५% लोकसंख्येला type-2 diabetes होता.
- १९९७ मध्ये insulin बनवणाऱ्या कंपन्यांच्या दबावामुळे ही पातळी कमी करून 126 mg/dl करण्यात आली. त्यामुळे diabetic रुग्णांची संख्या ३.५% वरून ८% झाली – म्हणजे कोणतेही लक्षण नसलेले ४.५% लोक रुग्ण बनवले गेले! १९९९ मध्ये WHO नेही हा standard स्वीकारला.
- Insulin companies ने प्रचंड नफा कमावला आणि नवीन फॅक्टऱ्या उभारल्या !
- २००३ मध्ये ADA (American Diabetes Association) ने fasting blood sugar 100 mg/dl ला diabetes चा standard घोषित केला. त्यामुळे विनाकारण २७% लोक diabetic रुग्ण बनले.
- आता ADA नुसार post prandial (जेवणानंतर) 140 mg/dl पेक्षा जास्त असेल तर ते diabetes चे लक्षण मानलं जातं. त्यामुळे जगातील सुमारे ५०% लोकसंख्या diabetic घोषित केली गेली आहे – यापैकी अनेक रुग्ण खरंतर आजारीच नाहीत.

भारतीय औषध कंपन्या हे प्रमाण अजून खाली म्हणजे 5.5% Hb1c पर्यंत आणण्याचा प्रयत्न करत आहेत. जेणेकरून अधिकाधिक लोक patients बनतील आणि औषधं विकली जातील.

जरी अनेक specialists मानतात की Hb1c 11% पर्यंत diabetes मानू नये.

**एक अजून उदाहरण :**

२०१२ मध्ये अमेरिकेच्या Supreme Court ने एका प्रसिद्ध औषध कंपनीवर $ 3 billion चा fine लावला. आरोप होता की त्यांच्या diabetes च्या औषधामुळे २००७-२०१२ दरम्यान heart attack मुळे मृत्यू दर ४३% ने वाढला होता.

कंपनीला हे आधीच माहित होतं, पण त्यांनी मुद्दामून लपवलं कारण त्यांना नफा हवा होता. त्याच कालावधीत त्यांनी 300 billion dollars चा नफा कमावला.

हीच आहे आजची 'अति-आधुनिक चिकित्सा व्यवस्था'!!

विचारा... आणि विचार सुरू करा !

**– वर्षा लाड**
मोबा. ९५४५६३५४६५

# पतिव्रता श्रीमंत मस्तानीबाईसाहेब...

डिसेंबर १७२८ मध्ये जयपूर जवळ बुंदेलखंडाचा वृद्ध राजा छत्रसालांचा मुहम्मदशहा बंगशने पराभव केला. बंगशने कुटुंबीयांसह राजा छत्रसालाला बंदी बनवले होते. त्या सर्वांना कैदी म्हणून तो दिल्लीला बादशहाकडे पाठवणार होता. बुंदेलखंडचा सिंह गणला गेलेल्या राजा छत्रसालासोबत यावेळी मोगल दरबाराचे धोरण फार कडक होते. प्रसंग मोठा बिकट होता. बुंदेलखंड जिंकलेल्या बंगशने पठाणांची राजवट तिथे आणली असती. शिवाय राजा छत्रसालाची आजवरची कीर्ती, प्रतिष्ठा कणाने देखील शिल्लक राहिली नसती. मोगलांचा कैदी म्हणूनच राजा छत्रसालाच्या जीवनाचा अंत झाला असता. कुटुंबातल्या स्त्रियांची अवस्था काय झाली असती हा आणखी वेगळा प्रश्न.. अशा दुर्धर प्रसंगी मराठे व राजपूत यांच्यात वेळप्रसंगी एकमेकांना मदत करुन बादशाही बुडवण्याचा करार पूर्वी झाला होता. त्या करारानुसार राजा छत्रसालांनी बाजीरावांकडे लष्करी मदत मागितली. मदतीच्या खलित्यासह दुर्गादास राठोड यांना बाजीरावांकडे पाठवले. राजा छत्रसालांनी पाठवलेल्या खलित्यांपैकी केवळ एकच दोहा आता उपलब्ध आहे. गजेंद्रमोक्षाची विनंती म्हणून तो आज देखील सर्वपरिचित आहे.

**जो गत ग्राह गजेंद्रकी !**
**सो गत भई है आज !!**
**बाजि जात बुंदेल की !**
**राखो बाजी लाज !!**

गजेंद्रमोक्षाचा खलिता मिळाल्यावर बाजीराव इतक्या त्वरेने जैतपूरच्या रोखाने निघाले की मराठी फौज जैतपूर पासून २२ मैलांवर पोहोचल्यानंतरच मुहम्मदशहा बंगशला फौजेची खबर मिळाली. मार्च १७२९ अखेर जैतपूर किल्लयाच्या परिसरात मुहम्मदशहा बंगशच्या फौजेशी मराठी सेनेचे युद्ध होऊन मुहम्मदशहा बंगशचा सपशेल पराभव झाला. या मोहिमेमुळे मराठ्यांचा पाय उत्तर हिंदुस्थानात कायमचा रुतून बसला. बुंदेलखंडाच्या यशानंतर एका मराठी सरदाराने पत्रात लिहिले आहे की, रावांचा पुण्यप्रताप ऐसा जाला आहे की, हस्तनापूरचे राज्य घेऊन छत्रपतीस देतील तर आज अनुकूल आहे. अशा दुर्धर प्रसंगी राजा छत्रसालाने मदतीची हाक दिली आणि मराठ्यांचा पराक्रमी पेशवा मोबदल्याची अपेक्षा न ठेवता त्वरित धावून गेला.

बंगशचा पराभव करून राजा छत्रसाल आणि त्यांच्या कुटुंबीयांची तर बाजीरावाने सुटका केलीच शिवाय गेलेले राज्य राजा छत्रसालाला परत मिळवून दिले. राजा छत्रसाल कृतज्ञ होता. बाजीरावाच्या युद्ध नेतृत्वाने त्याच्या दिलदार, देखण्या व्यक्तिमत्वाने

**लेखकांना सूचना**

नवस्नेह मासिकाचा दिवाळी अंक १० ऑक्टोबर रोजी प्रकाशित होत आहे. कृपया लेखकांनी आपले साहित्य ऑगस्ट महिन्याअखेर पाठवून सहकार्य करावे, ही विनंती. मजकूर सुवाच्च अक्षरात कागदाच्या एका बाजूस लिहिलेला असावा.
अथवा ऑनलाईन मजकूर व्हॉटस्ॲप क्र. ७६२०५४६२२५ वर शक्यतो Text Message Type मध्ये अथवा word file (Unicode or Shree Lipi) मध्ये पाठवावी.

भारुन गेला होता. आणि म्हणून राज्याचा तिसरा हिस्सा देण्याची घोषणा त्याने केली. हा संबंध आणखी दृढ व्हावा म्हणून अप्सरेसारखी सुंदर असणारी आपली कन्या मस्तानी हिचा बाजीरावांशी खांडा पद्धतीने विवाह लावून दिला. खांडा ही सरळ तलवार. तलवार वा कट्यारिशी लग्न लावण्याची प्रथा उत्तरेकडे होती. याशिवाय तीन लाखांची जहागीर ही राजा छत्रसालांनी दिलेली वरदक्षिणा होती. या यशस्वी स्वारीनंतर बुधवार, दि.१६ जुलै १७२९ रोजी अजिंक्य योद्धा बाजीरावांचे श्रीमंत मस्तानीबाईसाहेब यांचेसह पुण्यात आगमन झाले. धडफळ्यांच्या वाड्यात पेशवे परिवारासह श्रीमंत मस्तानीबाईसाहेब राहू लागल्या. राजा छत्रसालाने श्रीमंत मस्तानीबाई-साहेबांना ललित कलांचे शिक्षण दिले होते. शस्त्रास्त्र विद्या शिकवली होती. तलवार, भाले चालवण्यात श्रीमंत मस्तानीबाईसाहेब तरबेज होत्या. अश्वविद्येत प्रवीण होत्या. प्रणामी पंथ असल्यामुळे त्या शाकाहारी होत्या. राजा छत्रसाल हे प्रणामी पंथाचे होते. प्रणामी पंथाच्या आचरणाची जी नियमावली आहे त्याला रेहनी म्हणतात. तिचा नियमच आहे पिना तमाखू छोड दो , और मांस-मछली सब ! शराब और सब कैफ, पर दारा चोरी न कब !! तंबाखू , कैफ आणणाऱ्या नशिल्या चीजा, दारु, मांस-मासे, परदारागमन या गोष्टी प्रणामी पंथाने निषिद्ध ठरवलेल्या आहेत.

श्रीमंत काशीबाईसाहेबांना ही गोष्ट ठाऊक होती आणि म्हणूनच त्यांचे श्रीमंत मस्तानीबाई-साहेबांशी सौहार्द होते. अजिंक्य योद्धा बाजीरावांच्या निधनाची बातमी पोहोचताच श्रीमंत मस्तानीबाई-साहेबांना इतका तीव्र धक्का बसला की, त्याक्षणी त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. पाबळला श्रीमंत मस्तानीबाईसाहेब यांच्या खाजगी मालमत्ता असलेल्या आवारात त्यांना पुरण्यात आले. तिथे त्यांची समाधी आहे. कबर नव्हे. प्रणामी पंथात मृताला पुरतात आणि समाधी बांधतात. राजा छत्रसालाचेही दहन झाले नाही त्यांना पुरण्यात आले. परमप्रतापी मदनासारख्या देखण्या असलेल्या बाजीराव पेशव्यांची परिसारखी सुंदर पत्नी श्रीमंत मस्तानीबाईसाहेब तिथे चिरविश्रांती घेत आहे. श्रीमंत मस्तानीबाईसाहेबांचा मृत्यू लोकांना इतका अलौकिक वाटला की , त्या सती गेल्या असाव्यात असा एक प्रवाद ऐकायला मिळतो. त्यांचे जाणे सहगमन करण्याच्या योग्यतेचेच होते. श्रीमंत मस्तानीबाईसाहेबांच्या मृत्यूनंतर पेशव्यांच्या मुख्य देवघरात श्रीमंत मस्तानीबाईसाहेबांचा टाक ठेवण्याची सूचना चिमाजी आप्पांनी केल्याची इतिहास संशोधकांची नोंद आहे.

श्रीमंत मस्तानीबाईसाहेब बाजीरावांच्या विधिवत पत्नी होत्या. पेशवे कुलाची सून होत्या. सतीचे पावित्र्य त्यांच्यामध्ये होते. आणि म्हणूनच बाजीरावांचे रक्त असलेल्या श्रीमंत मस्तानीबाई-साहेबांचा वंश हा आजही भोपाळ, इंदूर, सिहोर येथे नांदतो आहे ही त्या पतिव्रता साध्वीचीच पुण्याई !

**- जगन्नाथ लडकत**

मोबा. ९४२२०२७७४४

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

**सराफी दुकान**

**गुरुवार**

**दि. 21 गुरुपुष्यामृत**

**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर, 0231-2546585**

# गुरु पौर्णिमा अर्थात् व्यास पौर्णिमा



आषाढ पौर्णिमा शके १९४७, व्यास पौर्णिमा, गुरु पौर्णिमा – त्या निमित्ताने

**भगवान महर्षी श्री व्यास मुनी आणि त्यांचं कार्य –**

हिंदू कालगणनेनुसार जो आषाढ महिना येतो त्यात तीन सण महत्वाचे येतात. आषाढ शुक्ल प्रतिपदा ही महाकवी कालिदास यांची जयंती. त्या नंतर भागवत संप्रदाय किंवा वारकरी संप्रदाय यांच्या साठी महत्वाचा उत्सव म्हणजे आषाढी एकादशी किंवा देवषयनी एकादशी. आणि तिसरा उत्सव म्हणजे आषाढी पौर्णिमा, श्री व्यास पौर्णिमा म्हणजेच श्री गुरु पौर्णिमा.

भारतीय परंपरेमध्ये श्री व्यास मुनींचं महत्व अनन्यसाधारण आहे.

धर्म पुराणानुसार इ.स.पू. ३००० च्या सुमारे आषाढ महिन्याच्या शुक्ल पौर्णिमेच्या दिवशी महर्षि वेद व्यास यांचा जन्म झाला होता. महर्षि वेद व्यास अत्यंत ज्ञानी, तेजस्वी आणि महान ऋषी होते. त्यांना चारही वेदांचे पूर्ण ज्ञान होते. म्हणूनच त्यांना वेद व्यास म्हटले गेले.

त्यामुळे आषाढ शुक्ल पौर्णिमा हा दिवस गुरू पौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणून साजरा केला जातो.

व्यासांची वंशावळी किंवा वंश परंपरा सांगायची झाली तर पहिले महर्षी वसिष्ठ ऋषी, त्यांचा पुत्र शक्ती, नातू पराशर आणि पणतू व्यास, व्यासांचा मुलगा शुक  अशी आहे.

ही सारी वंश परंपरा जर अभ्यासली तर या सार्‍यांची वैराग्य संपन्नता ही प्रकर्षाने जाणवावी अशी आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक आणि भारतीय जनसंघाचे संस्थापक, कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. दीनदयाळ उपाध्याय म्हणत असत, एखाद्या व्यक्तीचं महत्व हे त्याच्या कर्तृत्वाची सावली काळाच्या ओघात किती दूरवर पडली , यावरून समजू शकतं. (person can be judged by his shadow of his achievement over  the time span).

हे सूत्र किंवा हा निकष लावून महर्षी व्यासांचं कर्तृत्व किंवा कार्य जर जोखलं तर साधारणपणे पाच हजार वर्षांपूर्वी व्यासांनी जे कार्य केलं त्याचा प्रभाव किंवा त्याचे परिणाम आजही या आधुनिक युगात जाणवतात किंवा दिसतात.

महर्षी व्यासांनी अनेक महत्वाची कार्ये त्यांच्या जीवनकाळात पार पाडली , त्यांचा आवाका आज आपण पाहू लागलो तर केवळ थक्क व्हायला होतं.

महर्षी व्यास म्हटलं की सर्वप्रथम आपल्याला आठवतं ते म्हणजे महाभारत हे महाकाव्य. पण या शिवाय सुध्दा महर्षी व्यासांचं कार्य आणि कर्तृत्व अफाट आहे.

पैकी एक महत्वाचं काम सांगायचं झालं तर, व्यास मुनींनी हिंदू संस्कृतीत अतिशय महत्वाचे असलेले वेद, त्या वेदांची लावलेली व्यवस्था, वेदांचे केलेले प्रवर्तन.

व्यास मुनींच्या पूर्वी हे सारे वेद एकत्र स्वरूपात होते. व्यास मुनींनी ते सारे वेद त्यांच्या विषयानुसार किंवा उद्देशानुसार पृथक केले किंवा वेगळे केले. ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद आणि सामवेद असे हे चार वेद श्री व्यास मुनींनी वेगवेगळे केले. त्या नंतर प्रत्येक वेदाच्या संवर्धनासाठी आणि पुढच्या पिढीपर्यंत ते पोहोचवण्यासाठी चार वेगवेगळ्या ऋषींची नेमणूक केली. त्यांचे चार महान शिष्य होते. मुनि पैल यांना ऋग्वेद, मुनि वैशंपायन यांना यजुर्वेद, मुनी जैमिनी यांना सामवेद आणि मुनि सुमंतु यांना अथर्ववेद शिकवला.

हिंदू धर्मग्रंथानुसार, किंवा हिंदू परंपरेनुसार, महर्षी व्यास हे त्रिकालदर्शी होते आणि त्यांनी दिव्य दृष्टीने जाणले होते की कलियुगात धर्माचा ऱ्हास होईल. धर्माचा पाया कमकुवत झाल्यामुळे माणूस नास्तिक, कर्तव्यशून्य आणि अल्पायुषी होईल. प्रचंड वेदांचा व्यापक अभ्यास त्यांच्या क्षमतेच्या बाहेर असेल.

म्हणूनच महर्षी व्यासांनी वेदांचे चार भागात विभाजन केले. जेणेकरून कमी बुद्धी आणि कमी स्मरणशक्ती असलेल्या लोकांना सुद्धा या वेदांचा अभ्यास करता येईल.

व्यास मुनींनी त्यांची नावे ठेवली – ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद.

वेदराशीतील ऋचा वेगळ्या काढून त्यांच्या संग्रहाला सामवेद असे नावं दिले.

यज्ञाविषयी तपशीलवार ज्ञान देणाऱ्या गद्यभागाला यजुर्वेद म्हणून वेगळे केले.

यातूविद्येचे (जादूटोण्याचे) तसेच लौकिक व्यवहारात उपयोजले जाणारे मंत्र वेगळे करून त्याचे अथर्ववेद हे नामकरण केले.

वेदांचे विभाजन केल्यामुळे व्यास मुनी हे वेद व्यास या नावाने प्रसिद्ध झाले. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे अनुक्रमे पैल, वैशंपायन, जैमिनी आणि सुमंतमुनी या शिष्यांना शिकवले.

व्यास मुनींचं आणखी एक मोठं कर्तृत्व म्हणजे त्यांनी केलेली आठरा पुराणांची रचना.

वेदांमध्ये असलेले ज्ञान अत्यंत गूढ , शुष्क आणि कोरडे अशा स्वरूपाचे असल्यामुळे वेदव्यासांनी पाचव्या वेदाच्या रूपात पुराणांची रचना केली, ज्यामध्ये वेदांचे एकूण ज्ञान रंजक कथांच्या रूपात सांगण्यात आले आहे. त्यांनी आपला शिष्य रोमहर्षण याला पुराण शिकवले.

व्यास मुनींच्या शिष्यांनी त्यांच्या बुद्धीनुसार त्या वेदांच्या अनेक शाखा आणि उपशाखा निर्माण केल्या.

व्यास मुनींचं आणि एक आणि सर्वांना माहिती असलेलं कर्तृत्व म्हणजे त्यांनी केलेली महाभारताची रचना.

महाभारत या महाकाव्यात सुमारे १,१०,००० श्लोक असून, हा ग्रंथ ग्रीक महाकाव्ये इलियड व ओडिसी यांच्या एकत्रित आकाराच्याही सात पट मोठा आहे.

मानवी जीवनाच्या सर्व अंगांवर आणि विविध पैलूंवर प्रकाश पाडणारे हे महाकाव्य केवळ अद्वितीय आहे एवढेच नाही तर आजच्या आधुनिक युगातसुद्धा लागू पडणारे आहे.

साहित्यात जे नवरस शृंगार, हास्य, रौद्र, करूण, बीभत्स, भयानक, वीर, अद्भुत, शांत. हे सर्व या महाकाव्यात दिसतात.

आज या कलियुगात जे जीवन दिसते आहे ते व्यासांनी या महाकाव्याच्या माध्यमातून फार पूर्वी रेखाटले आहे.

**पान २४ वर पहा...**

शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक चव्वेचाळिसावा)

सोपानाचे डोळे मिटलेले होते. चेहरा लाल होता. पद्मासनात बसलेली त्याची बालमूर्ती अत्यंत तेजस्वी दिसत होती. सोपानाच्या पाठीमागच्या क्षितिजावर लाली पसरली होती आणि तेजाचा तो रंग सोपानाच्या मस्तकाभोवती पसरला होता. जणू तेजाची प्रभावळच ! सोपानानं हात जोडले. वंदन केलं आणि डोळे उघडले. समोर निवृत्तीदादा आणि ज्ञानेश्वर उभे होते. त्या दोघांना समोर बघून सोपानानं पद्मासन सोडलं. त्या दगडी आसनावरून उठून तो उभा राहिला आणि निवृत्तीदादाच्या चरणावर त्यानं मस्तक टेकवून वंदन केलं. तसंच ज्ञानेशालाही केलं. निवृत्तीदादानं त्याच्या खांद्याला धरून उचललं, उठवलं, उभं केलं. म्हणाला, ''सोपाना, आज अगदी लवकर आलास? झालं सगळं पाठांतर? झाली सगळी उजळणी? सोपानानं या प्रश्नांची उत्तरं नुसतीच होकारार्थी मान हलवून दिली आणि लगेचच पुढं विचारलं, ''दादा, आज वेदाभ्यासाला सुरुवात करायची आहे ना? वेद-उपनिषद कधी आत्मसात करेन असं मला झालंय !''

''अरे वा! त्यासाठी एवढ्या लवकर इथं येऊन उजळणी संपवलीस होय? निवृत्तीदादा सांभाळा हं! हा तुमचा शिष्य तीव्र बुद्धी, अगाध इच्छाशक्ती आणि अपार आकलनशक्तीचा आहे आणि माझ्या अंदाजानं त्याला विद्याभ्यासाचा भस्म्या रोग जडलाय!'' ज्ञानेशानं गंमत केलेली बघून निवृत्तीदादाला हसू आलं; पण सोपान मात्र रडवेला झाला. हिरमुसल्या चेहऱ्यानं म्हणाला, ''निवृत्तीदादा-ज्ञानादादा, मला भस्म्या रोग झालाय की नाही; मला माहीत नाही पण हे सारं ज्ञान, ही सारी विद्या, हे सारं सारं मी कधी शिकेन. कधी आत्मसात करीन असं झालंय ! कारण... कारण... कारण दादा आई-बाबांच्या देहान्तानं, चिमुकल्या मुक्ताला सांभाळण्याचं कर्तव्य पार पाडण्यात काही दिवस असेच गेले आहेत, नवनवीन विद्या, नवं ज्ञान न शिकता. आता त्या मधल्या दिवसांची पोकळी, मधल्या दिवसांची झालेली खोटी भरून काढायची आहे. म्हणूनच दादा मला सगळं लवकर शिकायचं आहे!'' बोलता-बोलता सोपानाच्या डोळ्यांत पाणी भरलं. ते डोळ्यांतून गालावर ओघळलं आणि बोलता-बोलता सोपान स्फुंदायला लागला. निवृत्तीलाही भरून आलं. खरंच असं झालं होतं!

आई-बाबा गेले, तेव्हा सोपान अगदीच लहान होता. त्यामुळे आपण आणि ज्ञानेश्वर विद्याभ्यासाला जात असताना त्यालाही न्यावं, असं लक्षातच आलं नाही आणि मुक्ता तर तेव्हा अगदीच लहान होती. तिच्याकडे लक्ष देण्यासाठी कुणीतरी घरी थांबायला हवं होतं. म्हणूनही कदाचित सोपानाला आपल्या बरोबर न्यावं, असं वाटलं नसावं; पण सोपानाचे ते दिवस मात्र नवीन काही न शिकता बाबांनी शिकवलेलं नुसतंच उजळणीत गेलं होतं, हे खरं होतं. कधीकधी निवृत्तीला त्याबद्दल खंतही वाटायची; पण त्या दिवसाची भर सोपाना अशी भरून काढतोय, हे बघून त्याला अतिशय आनंद झाला. तो लगेच म्हणाला, सोपाना, असं आहे तर आता एक क्षणही जाऊ न देता आपण वेदांच्या अभ्यासाला आरंभ करू या. ज्ञानेशा, तूही बस. तुझाही वेदाभ्यास राहिलाच आहे, असं म्हणून निवृत्ती त्याच्या आसनावर जाऊन बसला. त्याची अनुमती घेऊन ज्ञानेश्वर, सोपानही आपापल्या आसनांवर पद्मासन घालून बसले आणि निवृत्तीदादानं ज्ञानदानाला सुरुवात केली.

''सोपाना ऐक. वेद म्हणजे देववाणी. प्रत्यक्ष

देवांच्या मुखातून उमटलेली अमृतवाणी, म्हणजे वेद. 'सः वदतो इति वेद !' म्हणजे 'तो' जे वदला ते वेद. म्हणूनच वेद हे सर्व ज्ञानाचा, सर्व विद्यांचा, सर्व कलांचा, सर्व औषधांचा मूल स्रोत आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांचा अधिपती म्हणजे वेद. तर सलोकता, सरूपता, समीपता आणि सायुज्यता या चार मोक्षांचे अधिष्ठान म्हणजे वेद, कर्माचं संस्थान म्हणजे वेद आणि धर्माचं प्रतिष्ठान म्हणजे वेद. म्हणूनच मानवी जीवनाची मूल्याधिष्ठीत साक्ष म्हणजे वेद. म्हणून सोपाना, वेदांचं अध्ययन म्हणजे मानवी मूल्यांचं अध्ययन आणि वेदांचं उच्चारण म्हणजे मानवी विचारांचं, आचारांचं उच्चारण. मानवी जीवनाच्या जशा चार अवस्था आहेत, मानवी जीवनात जसे चार पुरुषार्थ आहेत, मोक्ष जसे चार आहेत आणि साधनेच्या जशा चार पायऱ्या आहेत, तसेच वेदही चार आहेत. ऋग्वेद जो सर्व वेदांचा उद्गाता आहे. मग यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद.'' निवृत्तीदादा बोलत होता आणि सोपानाच्या बोलक्या चेहऱ्यावर त्याच्या ज्ञानदानाचं हुबेहूब प्रतिबिंब उमटत होतं. एकाएकी सोपानाच्या चेहऱ्यावर एक प्रश्न उमटलेला निवृत्तीदादानं बधितला. तत्काळ त्याने विचारलं, ''बोल सोपाना बोल! काय प्रश्न आहे तुझ्या मनात?'' ज्ञानेशाला दादाच्या निरीक्षणशक्तीचा आदर वाटला. तोच सोपानानं विचारलं. ''दादा, देवांनी या वेदांचं उच्चारण का आणि कधी केलं?'' निवृत्तीदादांना अतिशय आनंद झाला. वेद शिकवतानाच हा मूळ गाभा त्यांनी मुद्दाम सोडला होता. त्यांना सोपानाची परीक्षा घ्यायची होती आणि सोपानानं नेमकं तेच विचारलं होतं. मोठ्या प्रसन्न मनानं निवृत्तीदादांनी उत्तर दिलं, ''सोपाना, तुझ्याकडून मी याच प्रश्नाची अपेक्षाही करत होतो आणि प्रतीक्षाही करत होतो. सोपाना, देवांमध्येसुद्धा काही देव वेगळे होते. ते ऋत्विक किंवा ऋत्विज होते. ऋत्विज म्हणजे नियमित यज्ञ करणारे आणि यज्ञातून पंचमहाभूतांना, श्रेष्ठ देवी-देवतांना प्रसन्न करून घेणारे आणि हे ऋत्विज यज्ञ करताना जे उच्चारण करीत असत, ते उच्चारण म्हणजे वेद. प्रत्येक वेदाचा एक-एक ऋत्विज आहे. जसा ऋग्वेदाचा 'ऋत्विज' 'होता', तर यजुर्वेदाचा ऋत्विज 'अध्वर्यु', सामवेदाचा ऋत्विज 'उद्गाता', तर अथर्ववेदाचा ऋत्विज 'ब्रह्मा' आणि या चार ऋत्विजांचं उच्चारण, म्हणजे हे चार वेद. उमजलं सोपाना?'' निवृत्तीदादांनी विचारलं.

खरंतर त्यांचं हे विचारणं तसं व्यर्थच होतं, कारण त्यांनी जे सांगितलं, ते सगळं समजल्याची, उमजल्याची प्रचिती सोपानाच्या चेहऱ्यावर उमटली होती. निवृत्तीदादांनी सांगितलेलं सगळं सगळं आकलन झाल्याची साक्ष त्याच्या डोळ्यांत उमटली होती. ती समजून घेऊन निवृत्तीदादा पुढे म्हणाले, ''हं! तर सोपाना, आता मात्र आपण वेदांच्या ऋचांचं उच्चारण सुरू करू या. मी प्रथम उच्चारतो तू पाठोपाठ अनुकरण कर!'' निवृत्तीदादांनी सांगितलं. सोपानानं मूकपणे मान डोलावली. त्याच्या मनातले प्रश्न, शंका या सगळ्यांची उत्तर नीट आणि नेमकी मिळाली होती आणि आता वेदांतील ऋचांचं उच्चारण करायला आरंभ करायचा आहे, या विचारानंच तो उत्तेजित झाला. आता आपल्याला वेद मुखोद्गत होणार, त्याच्या अर्थ अन्वयासह ! 'वेद म्हणजे ज्ञानाचं भांडार आहे,' असं त्यानं कित्येकदा त्याच्या बाबांच्या तोंडून ऐकलं होतं आणि आज त्याच ज्ञानभांडाराची कवाडं त्याच्यासाठी उघडली जाणार होती. ही तर आनंदाची गोष्ट होतीच; पण ती कवाडं उघडणारे हात त्याच्या दादाचे होते. ही त्याहीपेक्षा आनंदाची गोष्ट होतीच; आणि या द्विगुणित आनंदाने भारलेला सोपाना वेदांच्या ऋचा उच्चारण्यासाठी सिद्ध झाला. त्याच्या चेहऱ्यावरची उत्सुकता, डोळ्यांतली आतुरता, देहाला सुटलेली थरथर, मनाला लागलेली आस आणि अनावर उल्हासाने थुईथुई नाचणारं हृदय! सोपाना असा अवघा, अवघा वेदांच्या ऋचांच्या उच्चारणासाठी आसुसला होता आणि हे सगळं निवृत्तीदादांच्या नजरेतून सुटलं नाहीच. त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रसन्न स्मित उमटलं. त्यांनी

एक धावता कटाक्ष ज्ञानेश्वराकडे टाकला. त्याच्याही चेहऱ्यावर कमालीची उत्सुकता, सोपानाबद्दलचं अपरंपार कौतुक आणि निवृत्तीदादांबद्दल निरातिशय आदर उमटला होता. एकवार ज्ञानेशाकडे कटाक्ष टाकून निवृत्तीदादांनी डोळे मिटले. एक हात आपल्या हृदयावर ठेवला आणि एकवार त्या गोपालकृष्णाचं स्मरण करून त्यांनी ऋग्वेदाची ऋचा उच्चारायला सुरुवात केली.

**''ॐ अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम्।**
**होतारम् रत्नधात मम्।**
**अग्निपूर्वेभित्रऋषिभिरीऽ योनूतनैरूत।**
**स देवां एह वक्षति।''**

निवृत्तीदादा ऋचांचं उच्चारण करत होते आणि पाठोपाठ सोपान त्यांचं अनुकरण करत होता. निवृत्तीदादांचा गंभीर स्वर अवघ्या चराचराला भेदून आकाशगामी होत होता. त्या स्वरानं अवघ्या चराचराला थरथर सुटली होती. अवघं चराचर व्यापून तो स्वर गगनमंडळात भरून राहिला होता. त्या स्वरानं झाडं, पानं, वेली, फुलं, गवताची पाती अवघ्या सृष्टीचा थरकाप उडाला ! स्वर प्रलय होतोय की काय, अशी शंका सृष्टीच्या मनात उद्भवली. इतक्यात पाठोपाठ सोपानाचा अनुनासिक, कोवळा मुलायम स्वर त्या प्रलयंकारी स्वरावर पसरला आणि सहस्त्ररश्मींच्या तेजामुळे हुळहुळणाऱ्या त्वचेवर चंद्रकिरणांच्या शीतलतेचं लेपन केल्यासारखं झालं आणि अवघ्या सृष्टीनं आनंदानं, प्रसन्नतेचा, उन्मुक्ततेचा, उत्फुल्लतेचा श्वास घेतला !

निवृत्तीदादांच्या घनगंभीर ध्वनीने तेजो-वलयांकित स्वरमंडळ रेखावं आणि आपल्या अलवार, कोवळ्या स्वरानं सोपानानं त्या तेजोवलयांकित स्वरमंडळाला नाजूक, शीतल अशा प्राजक्ताच्या फुलांची माला बनवावी ! निवृत्तीदादांनी आपल्या आकाशगामी ध्वनीनं गगनमंडळात नवग्रहांची तेजस्वी माला चितारावी आणि सोपानानं आपल्या मऊशार, लाघवी, स्निग्ध आणि नाजूक कोंबाची कोवळीक असणाऱ्या स्वराने त्या ग्रहमंडळावर श्रावणसरींची रिमझिम आणि कोवळेशार सूर्यकिरण, यांच्या दृक्श्राव्य संमेलनातून उगवलेल्या इंद्रधनूचं रेखाटन करावं ! निवृत्तीचं ऋचा उच्चारण आणि सोपानाचं अनुकरण, यातून असं ध्वनिसंमेलन घडत होतं ! अवघ्या सृष्टीला धन्यता वाटत होती. अवघं चराचर पुलकित होत होतं. अवघ गगनमंडळ रोमांचित होत होतं आणि स्वतः ध्वनी, तो तर कृतार्थ-कृतार्थ होत होता.

**'सप्तहस्तश्चतुः शृङ्गः सप्तजिव्हो द्विशीर्षकः।**
**त्रिपाद प्रसन्नवदनः सुखासीनः शुचिस्मितः।।**
**स्वाहां तु दक्षिणे पाश्र्श्वे देवी वामे स्वधां तथा।**
**ब्रिभ्रद् दक्षिणहस्ते तु शक्तिमन्नं शुचं श्रुवम्।।**

वेदातलं अग्नीचं हे वर्णन निवृत्तीदादा उच्चारत होते आणि त्यांच्या घनगंभीर स्वरापाठोपाठ सोपानाचा कोवळा स्वर ऋचा म्हणत होता. सोपानाचा वेदाभ्यासाचा असा अप्रुपाचे अप्रूप असणारा, कवतिकाचं कवतिक सांगणारा प्रारंभ झाला होता.

(क्रमशः)

**– सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**युनियन बँक ऑफ इंडिया, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**


# मुलांचे पान




## » चित्र रंगवा




## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा





# ब्राह्मण आणि सरकारी अनुदान

**भाग ७**

आत्तापर्यंत आपण अमृतच्या वेगवेगळ्या योजना बघितल्या. त्यातील खाली दिलेल्या बहुतांश योजना, शिक्षणाकरता/नोकरीकरिता कौशल्य मिळवणे या करिता अर्थसहाय्य / प्रोत्साहन देणाऱ्या होत्या. आता हा समारोपाचा लेख .

आत्तापर्यंत आपण अमृत या सरकारी संस्थेच्या वेगवेगळ्या योजनांची माहिती घेतली आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल ब्राह्मणांना कशा वेगवेगळ्या सवलती मिळतात हे बघितले. या शिवाय सर्वसाधारण नागरिकांना कशा वेगवेगळ्या प्रकारच्या सोयी उपलब्ध आहेत हे बघू या .

सर्वप्रथम आपण शासनावर विश्वास बाळगला पाहिजे. शेवटी आपल्या स्वतंत्र भारताचे सरकार हे Democartic Welfare State म्हणजेच लोकशाही कल्याणकारी राज्य आहे आणि सर्वच लोकांच्या (लिंगभेद विरहित आणि जाती विरहित) अडी-अडचणी सोडवायला नक्कीच कटिबद्ध आहे, मग कुठल्याही पक्षाचे सरकार असो.

**वैद्यकीय सोयी :-**

कोविडचा काळ आठवा. सरकारने लसीकरण तर राबवलेच, पण रुग्णांकरिता नि:शुल्क इस्पितळाची पण जागोजागी सोय केली. या इस्पितळांत अतिशय उत्तम सोय होती. ज्या लोकांचा सरकारी व्यवस्थेवर भरवसा नव्हता , त्यांनी खाजगी इस्पितळाचा आसरा घेतला, जिथे अत्याधुनिक सोय तर नव्हतीच पण रु . २ ते ३ लाख खर्च करायला लागले.

त्यामुळे मला परत एकदा सांगावेसे वाटते की आपण शासनावर विश्वास बाळगू या. आणि शासनाच्या वेगवेगळ्या सोयींची माहिती करून घेऊ या.

काही दिवसांपूर्वी, पोटदुखीने त्रस्त होऊन मी डॉक्टरांकडे गेलो. डॉक्टरांनी तपासले, दुखण्याचे निदान केले आणि औषध दिले . त्यांच्या निदानाच्या पुष्टीकरणाकरता त्यांनी Sonography Test सुचवली. मी खाजगी चिकित्सायलयांकडे चौकशी केली, त्या सगळ्यांनीच या टेस्टकरता रु. २००० चार्ज पडेल हे सांगितले. मी जवळच्याच सरकारी इस्पितळात गेलो , रु. १० देऊन केस पेपर काढला, अर्ध्या तासात माझी टेस्ट झाली आणि अहवालाकरता फक्त रु. १०० द्यावे लागले ! ही गोष्टच दर्शवते की वैद्यकीय तपासण्या / चाचण्या सरकारी इस्पितळात किती कमी खर्चात होतात !

मुंबईच्या सरकारी इस्पितळांत Paid Patient Facility आहे, जिथे नाममात्र दरांमध्ये आपण भरती होऊ शकतो आणि सर्जरी करावयास लागली तरीही खूपच कमी खर्चात होते. रुग्णांकरिता स्वतंत्र खोली मिळते (संडास बाथरूमसाहित), जेवणाखाण्याची सोय असते, शिवाय एका नातेवाईकाची रहाण्याची पण सोय असते. येथे कुठलेही आरक्षण नाही. अशीच सोय कदाचित महाराष्ट्रामधील, इतर शहराच्या सरकारी इस्पितळातही असेल. आपण या सवलतीचा फायदा उठवला पाहिजे.

**प्रवासी भाडे सवलत**

अ) महाराष्ट्र एस . टी . बसमध्ये -

१) सर्व महिला प्रवाशांना भाड्यामध्ये ५०% सवलत आहे .

२) ७५ वर्षावरच्या वृद्धाना प्रवासी भाड्यामध्ये १००% आणि ६५ ते ७५ वर्षांमधल्या वृद्धाना ५०% सवलत आहे .

ब) करोनानंतर रेल्वेने वृद्ध माणसांना मिळणारी भाड्यातील सवलत पूर्ण बंद केली आहे.

क) विमान प्रवासामध्ये , आपण ज्या विमान कंपनी द्वारे प्रवास करतो त्यानुसार मूळ भाड्यात ५% ते ५०% सवलत मिळते.

**मुलींचे शिक्षण**

१) सगळ्या मुलींना अनुदानित शाळांमध्ये / महाविद्यालयात पदवी परीक्षेपर्यंत, शिक्षण मोफत आहे.

२) उच्च शिक्षणाकरता पण , ज्या मुलींचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु. ८ लाखापर्यंत आहे, त्यांना शिक्षण मोफत मिळते. ही सवलत ६४२ व्यवसायिक अभ्यासक्रमांना लागू आहे.

**महिला वर्ग**

महिलांसाठी महाराष्ट्रात खालील योजना कार्यन्वित आहेत

१) लेक लाडकी योजना

२) महिला उद्योगिनी योजना

३) स्वर्णिमा योजना

४) उद्योजक योजना

५) महिला सन्मान योजना

६) महाराष्ट्र विधवा पेन्शन योजना

७) प्रधानमंत्री मातृवंदना योजना

८) माझी कन्या भाग्यश्री योजना

९) सुकन्या समृद्धी योजना

१०) जननी सुरक्षा योजना

११ ) महिला समृद्धी कर्ज योजना

१२ ) लाडकी बहीण योजना

एवढ्या सगळ्या योजनांची तपशीलवार माहिती येथे देणे शक्य नाही . फक्त सध्या गाजत असलेल्या लाडकी बहीण योजनेत मी येथे नमूद करतो की १८ ते ६५ वयोगटातील महिलेस, जिचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु. अडीच लाखापर्यंत आहे , दरमहा रु . १५००.०० देण्याची सोय आहे.

**वरिष्ठ नागरिक**

१) ज्या नागरिकांचे वय ७० वर्षावर आहे, त्यांच्याकरता, आयुष्यमान भारत ही मेडिक्लेम इन्शुरन्स योजना रु. ५ लाखापर्यंत नि:शुल्क उपलब्ध आहे.

२) ज्या वरिष्ठ नागरिकांचे कौटुंबिक वार्षिक उपन्न रु. २. ५० लाखाच्या आत आहे त्यांना धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थाटन योजना आहे

३) अतिशय गरीब, ६५ वर्षावरील नागरिकांसाठी , ज्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु. २१ हजाराच्या आत आहे . त्यांच्याकरता श्रावण बाळ योजना आहे, ज्यामध्ये महिना रु. ६०० पेन्शन देण्यात येते.

अशा रीतीने आपणाला दिसून येईल की सरकारच्या विविध योजना आहेत, ज्याचा सर्वसाधारण नागरिक लाभ घेऊ शकतात. आपण जर आपले डोळे आणि कान उघडे ठेवले तर आपण या योजना माहिती करून घेऊ शकतो आणि लाभही घेऊ शकतो.

आजकाल प्रत्येकाकडे दूरध्वनी असतोच, त्यावर गुगलवर सगळी माहिती मिळू शकते .शिवाय बहुतेक योजनांखाली अर्जसुद्धा ऑनलाईन करायचे असतात. एक गोष्ट मात्र खरी की आपणाकडे आधार कार्ड असले पाहिजे आणि त्याला जोडलेले बँक खाते असले पाहिजे कारण लाभ बँक खात्यात जमा होतो.

अशा प्रकारच्या कल्याणकारी योजना असाव्यात किंवा नाही याबद्दल कदाचित दुमत असू शकेल. पण जोपर्यंत अशा योजना आहेत तोपर्यंत सर्वसामान्यांनी त्यांचा लाभ उठवला पाहिजे आणि उठवावा हा आग्रह !

**– श्रीकांत शिंत्रे,**

मोबा. ९६१९११९६७०५

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमशः वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ८ : अक्षरब्रह्मयोग**

श्री अर्जुन उवाच ।

**श्री गणेशाय नमः ।। अर्जुन म्हणे गा पुरुषोत्तमा**
**कैसा निवाडा अध्यात्मा आणि कर्म ब्रह्मा ।**
**आधीभूत आधीदैवत आम्हां । निवडुनी सांगा ।।**
ब्रह्म तें बोलिलें काय काय अध्यात्म कर्मं ते
अधि-भूत कसे सांग अधि-दैव हि ते तसे ।।१।।

**आधीयज्ञ कैसा कोण । देही जाणावा कवण ।**
**अंतःकाळी तूं मधुसूदन । मज कैसेन पावसी ।।**
अधि-यज्ञ कसा कोण ह्या देही बोलिला असे
प्रयाणी हि कसे योगी निग्रही तुज जाणती ।।२।।

श्री भगवानुवाच ।

**देव म्हणे अक्षर तें ब्रह्म । तेथे परम सद्भावाधीन ते अध्यात्म । भूत भावाचे करणे विसर्ग कर्म । बोलिजे ते ।।**
ब्रह्म अक्षर ते थोर अध्यात्म निज-भाव जो
भूतसृष्टि घडे सारी तो जो व्यापार कर्म ते।।३।।

**अक्षर तेचि आधीभूत । तू पुरुष म्हणोनी तो आधीदैवत । आधी यज्ञ तो मी सर्व दहीवर्तत । आत्मरूपे ।।**
अधि-भूत विनाशी जे जीवत्व अधि-दैवत
अधि-यज्ञ असे मी चि ह्या देही यज्ञ-पूत जो ।।४।।

**अंतकाळी मज स्मरोनी । जे जाती देह त्यजुनी ।**
**ते पावती मज लागुनी । येथ संशय नाही ।।**
अंत-काळी हि माझे चि चित्ती स्मरण राखुनी
देह सोडूनि गेला तो मिळे मज न संशय ।।५।।

**ज्या ज्या भावे मज स्मरता ।**
**होय कलीवर त्यागिता । ते ते पावती कौतिसुता ।**
**सदा सद्‌भाविक म्हणोनी ।।**
जो जो आठवुनी भाव शेवटी देह सोडितो । मिळे त्या त्या चि भावास सदा त्यांत चि रंगला।।६।।

**या कारणे मज सर्व काळ विचारी । मज स्मरोनिया युद्ध करी । माझे ठायी मन बुद्धि दृढ धरी । तेणे मज पावसी निश्चित ।।**
म्हणूनि सगळा काळ मज आठव झुंज तूं ।
मन बुद्धि समर्पूनि मज निःशंक पावसी ।।७।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस्ॲपवर पाठविली जाईल.**



वैदिक सन्मान

## माननीय वे. मू. श्री. महादेव वासुदेव जोशी

जन्मतारीख : २३-५-१९६३

जन्मस्थळ : कुर्ला, ता. बीड

शालेय शिक्षण : इयत्ता ७ वी पर्यंत.

धार्मिक शिक्षण : प.पू.चिन्मयानंद स्वामी मठ, उमरखेड (औदुंबर क्षेत्र), ता. उमरखेड, जि. यवतमाळ (विदर्भ) गुरु पुरुषोत्तमानंद स्वामी महाराज यांच्या सान्निध्यात १९७२ ते १९८२ या कालावधीमध्ये धार्मिक शिक्षण.

वेशासं (वेदभास्कर) विद्यागुरू श्री. राजारामबुवा जोशी, माजलगाव यांचेकडे शुक्ल यजुर्वेद संहिता व १७ अध्याय, पदपाठ आणि याज्ञिकाचे अध्ययन.

बीड ग्रामी ४ विद्यार्थ्यांना नित्यकर्म रुद्रादी संथा दिली.

१९८६ नंतर करवीर, कोल्हापूर येथे पौरोहित्य आणि सुमारे ७ विद्यार्थ्यांना कर्मकांड संथा आणि याज्ञिकीचे शिक्षण दिले.

पत्ता : 'वेदाक्षर', गणेश कॉलनी, प्लॉट नं. १७, आय.टी.आय.जवळ, कळंबा, कोल्हापूर.



आदर्श माता

## माननीय श्रीमती वैशाली वसंत पोंक्षे

जन्म : कोल्हापूर येथे चित्पावन ब्राह्मण मध्यमवर्गीय आपटे परिवारात झाला. माहेरचे नाव : कु. आशा वामन आपटे. पाच भावंडांमध्ये सर्वात ज्येष्ठ. पाठीवर दोन बहिणी आणि दोन भाऊ. वडिलांचा किराणा व्यवसाय तर आई गृहिणी. लहानपणापासून नीटनेटकेपणा आणि जे काही काम करायचे ते उत्तम रितीनेच हा मूळ स्वभाव.

कोल्हापूर येथेच एम.ए.पर्यंतचे संपूर्ण शिक्षण. उत्तम गुणांसह मराठी विषयात पदवी. त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीनुसार विवाह निश्चिती झाली. पती बँकेत चांगल्या पदावर कार्यरत. विवाहापश्चात तासगाव, विटा, गडहिंग्लज, कराड येथे पतीच्या नोकरीनुसार वास्तव्य. एप्रिल २००० मध्ये अचानक पतींचे अपघातात निधन झाले आणि आयुष्यात खूप मोठी पोकळी निर्माण झाली. त्यावेळी कन्या इंजिनिअरींगच्या तिसऱ्या वर्षात तर चिरंजीव नववीत शिकत होता. मात्र मन खंबीर करून माहेरच्या पाठिंब्यावर कोल्हापूर येथे स्थायिक झाल्या.

येथे आल्यावर प्राप्त परिस्थितीत घरगुती स्वरूपात फराळाचे पदार्थ तयार करून विक्रीची सुरुवात केली. केलेल्या सर्वच पदार्थांची उत्तम चव ग्राहकांच्या पसंतीस उतरली. ग्राहकांनीच केलेला तोंडी प्रचार व्यवसायात खूप काही देऊन गेला. आज भारतातच नव्हे, तर परदेशात जाणाऱ्या कोल्हापुर-करांनी त्यांच्याकडील फराळाला मोठा प्रतिसाद दिला असून आजही देत आहेत. पदार्थांची चव आणि दर्जाच्या बाबतीत काटेकोर असणाऱ्या पोंक्षे काकू अतिशय माफक नफा घेऊन हा व्यवसाय आजही करीत आहेत.

काकूंच्या कन्या आणि जावई अमेरिकेत स्थायिक असून काकूंना दोन नातवंडेही आहेत. चिरंजीव आणि सून भारतात मुंबई आणि पुणे येथे बहुराष्ट्रीय कंपनीत कार्यरत आहेत.

माहेरच्या आणि सासरच्या दोन्ही कुटुंबांना अध्यात्माची आवड असलेने पोंक्षे काकूंनीही ती प्रयत्नपूर्वक जोपासली आहे. सर्वश्री भावेकाकांना आदर्श मानून त्यांनी चालवलेल्या स्तोत्रपठण वर्गात गेली काही वर्षे काकूंचा सक्रिय सहभाग आहे.

कुटुंबातील विहित कर्तव्ये पतीच्या पश्चात व्यवस्थित रितीने पार पाडून आज सत्तरीनंतरही आरोग्य सांभाळून त्या व्यवसायात मग्न आहेत.



सामाजिक कार्यकर्त्या

## माननीय सौ. जयश्री केशव भागवत

जन्मतारीख : २१-१-१९५३

जन्मठिकाण : अंबव पोंक्षे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

प्राथमिक शिक्षण : मराठी शाळा, अंबव, माखजन येथे जुनी एस.एस.सी. पर्यंत.

विवाह : १६-४-१९७२ देवरुख येथे.

सामाजिक कार्य : कोल्हापूर चित्पावन संघाच्या माजी संचालक. सभासद गोळा करणे, महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा, सार्वजनिक बोडण सोहळा, कोजागिरी कार्यक्रम आयोजन आणि नियोजनाची जबाबदारी खंबीरपणे पेलली.

श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्थेच्या स्थापनेत प्रवर्तक, महिला संचालक म्हणून कार्यरत. सभासद, ठेवी व कर्जवाटप आणि वसुली यामध्ये सक्रिय सहभाग.

नेहमीच गरजू लोकांना मदतीचा हात.

पती गद्रे ऑईल इंजिनमध्ये काम करीत होते. मुलगा ॲड. श्री. अमोघ केशव भागवत, सूनबाई सौ. अपर्णा अमोघ भागवत आणि दोन नातींसमेवत निवृत्तीचे जीवन व्यतित करीत आहेत.

सध्या दत्तमंदिर, कोल्हापूर येथे नामस्मरण, स्तोत्रपठण आदींमध्ये व्यस्त.



पत्रकार सन्मान

## माननीय श्री. समीर सुधाकर देशपांडे

शिक्षण : बी.ए., बी.जे.सी., एम.एम.सी.जे. (मास्टर ऑफ मास कम्युनिकेशन ॲन्ड जर्नालिझम)

दै. तरुण भारत, दै. दिव्या मराठी (भास्कर समूह) मध्ये मुख्य प्रतिनिधी, मुख्य उपसंपादक, विशेष प्रतिनिधी म्हणून काम. सध्या दै. लोकमत मध्ये वरिष्ठ वार्ताहर.

राजकारण, ग्रामीण विकास, शासकीय योजना आणि अंमलबजावणी, सांस्कृतिक, साहित्यिक विषयांवर सातत्याने लेखन.

'प्रतिभावंतांचे आजरे' आणि 'गाथा ग्राम-विकासाची' ही सामाजिक विषयांवरील पुस्तके प्रकाशित. विविध विशेषांक आणि स्मरणिकांचे संपादन.

आकाशवाणी सांगली आणि कोल्हापूर केंद्रांवरून विविध विषयांवर भाषणे आणि अनेक निवडणुकांचे वार्तांकन.

केंद्र सरकारच्या पंचायत राज विभागाच्या हैद्राबाद येथे झालेल्या पाच दिवसीय कार्यशाळेत सहभाग. यासह पुणे येथील यशदा संस्थेने आयोजित 'प्रसारमाध्यमे व विकास' या विषयावरील तीन दिवसाच्या कार्यशाळेत सहभाग आणि उत्कृष्ट सहभागाचे प्रशस्तीपत्रक प्राप्त.

आंतरराष्ट्रीय कुष्ठरोग संघटना, पुणे आयोजित कार्यशाळेत सहभाग. भोपाळ येथे आयोजित पत्रकार प्रशिक्षण कार्यशाळेत सहभाग.

शासनाच्या आणि इतर सामाजिक संस्थांच्या अनेक पुरस्कारांचे मानकरी.

पत्ता : प्लॉट नं. १०४, वनराई रेसिडेन्सी, ६४८/२८ प्लॉट नं. १, बी वॉर्ड, सरनाईक वसाहत, महालक्ष्मी नगर (गोखले कॉलेजजवळ), कोल्हापूर.

# विशेष गौरव पुरस्कार



**आदरणीय श्री. भावेकाका यांसी...**

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे आज आपणासारख्या ज्येष्ठ हितचिंतक आणि आदरणीय व्यक्तीचा सन्मान करताना आम्हाला अत्यानंद होत आहे !

कोल्हापूर चित्पावन संघाशी आपण स्थापनेपासून निगडीत आहात. संस्थेच्या प्रवर्तकांपासून विद्यमान संचालकांपर्यंत सर्वांस वेळोवेळी आपल्या मार्गदर्शनाचा लाभ मिळत राहिला आहे.

काका, आपण वयाच्या २१ व्या वर्षी १९६२ साली कोकणातील रोह्यातून चरितार्थासाठी कोल्हापुरी आलात. १९७० साली न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीत नोकरीला लागलात आणि २६ वर्षांनंतर १९९६ साली याच कंपनीतून डिव्हिजनल मॅनेजर पदावरून निवृत्त झालात.

सुखी आणि समाधानी सांसारिक जीवनानंतर निवृत्तीचा काळ सुसंस्कारी समाज निर्मितीसाठी देऊन २००६ साली तुम्ही 'संस्कार गुरुकुलाची' स्थापना केली. सप्तशती पठण वर्गाची सुरुवात केली. २००७ साली 'श्री महालक्ष्मी स्तोत्रपठण वर्ग' सुरू केले आणि हजारो स्त्री-पुरुषांना दैनंदिन नित्य स्तोत्रपाठाचे शिक्षण दिले, मुला-मुलींसह ज्येष्ठांनाही स्तोत्रपठणाची गोडी लावली. लहान स्तोत्रांबरोबर रुद्र, पवमानस्तोत्र अशा कठीण स्तोत्रांच्या आरोह अवरोहयुक्त पठणातही आपण अनेक स्त्री-पुरुषांना पारंगत केले.

या स्तोत्रांच्या, पूजापाठांच्या सुमारे आठ संग्राह्य पुस्तिका तयार करून, त्याच्या हजारो प्रती छापून, विना नफा किंमतीत त्यांचे भाविकांत वाटप केले. महाराष्ट्रभर आजही अनेक भाविकांनी आपल्या देवघरात सणासुदीसाठी या पुस्तिका सांभाळून ठेवल्या आहेत.


काका, आपण प्रभू श्रीराम आणि समर्थ रामदास स्वामींचे निस्सीम भक्त आहात. शिवथरघळ येथील श्री सुंदरमठ सेवा समितीत १९९९ सालापासून १३ वर्षे पदाधिकारी म्हणून तुम्ही भरीव काम केले आहे. घळीतील भक्त निवासाच्या बांधकामात आपला खारीचा वाटा उचलण्यासाठी निस्वार्थ भावनेने समितीला काही भरीव रक्कमेची देणगी देऊन सामाजिक कार्याला सक्रिय हातभार लावला आहे.

समर्थांच्या 'उपासनेला बहु चालवावे' या उक्तीनुसार 'रामनाम' आपल्या मुखी वसले आहे. 'श्रीराम जयराम जयजयराम' हा तेराक्षरी नामजप गेली तेरा वर्षे रोज १३ माळा याप्रमाणे सकलांच्या कल्याणासाठी आणि मन:शांतीसाठी आपण करीत आहात !

काका, आज आपण आयुष्यात कृतार्थ आहात ! कुलस्वामी भगवान परशुराम आणि प्रेरणामूर्ती श्रीरामप्रभू दोघांनीही आपल्या या धर्मलोलुपतेची नक्कीच नोंद घेतली असेल.

आपणाला शतकोत्तर निरामय जीवन आणि उत्तम आयुरारोग्य लाभो ! परशुधारी आणि कोदंडधारी दोन्ही रामांची कृपादृष्टी आणि श्री महालक्ष्मीचे कृपाशीर्वाद सदोदित आपल्या पाठीशी राहोत!

# विशेष गौरव पुरस्कार



**माननीय श्री. दिगंबर कृष्णाजी जोशी यांसी...**

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे संघाचे ज्येष्ठ हितचिंतक म्हणून आपला सत्कार करताना आम्हाला अत्यानंद होत आहे !

सन १९७४ साली व्यवसायासाठी आपण रत्नागिरीहून कोल्हापुरी आलात. यामागे कोल्हापूरच्या आंबामातेची कृपा आणि ईश्वरी नियोजन असल्याची आपली श्रद्धा आहे. १९७६ मध्ये आपण 'जागृती ट्रान्सपोर्ट'ची शाखा इथे सुरू केली आणि गेली ५० वर्षे आपल्या या व्यवसायाची भरभराट होत आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आपण सक्रिय कार्यकर्ते आहात.

सन १९९५ पासून आपली श्री पंचगंगा नागरी सहकारी बँकेत संचालकपदी निवड होऊन तीन वेळा बँकेचे उपाध्यक्षपद आणि एकदा अध्यक्षपदी काम करण्याची संधी मिळाली. या काळात अनेक सामाजिक व राजकीय व्यक्तींचा सहवास मिळून निरनिराळ्या सामाजिक उपक्रमात आपणांस सक्रिय सहभाग घेता आला. कोल्हापूर लॉरी ऑपरेटर असोसिएशनमध्ये संचालकपदी निवड झाली.

आपल्या आयुष्यात गुरुकृपा असणे फार महत्त्वाचे आहे अशी आपली धारणा आहे. आपल्या घराण्याचे श्री स्वामी शिवानंद यांच्याशी आपले अत्यंत जवळचे सेवासंबंध असल्यामुळे आपणाला सन १९९० पासून सन २०२० पर्यंत ३० वर्षे गुरुसेवेची संधी मिळाली. पांगरे येथील शिवानंद महाराज ट्रस्टचे सचिव म्हणून काम करताना अनेक संत सज्जनांचा, सत्पुरुषांचा सहवास लाभला आणि आपली परमार्थाची वाटचाल सुरू झाली. त्या काळात वासुदेव शास्त्री टेंब्येस्वामी यांच्या पत्नी अन्नपूर्णामाता यांच्या गंगाखेड येथील समाधीचा तसेच प.पू.टेंब्येस्वामी महाराजांच्या गरुडेश्वर येथील समाधीचा जीर्णोद्धार करण्याचे सेवाकार्य आपणाकडून घडले.

कोल्हापूर चित्पावन संघाशी आपण स्थापनेपासून निगडीत आहात. संघास वेळोवेळी आपल्या मार्गदर्शनाचा लाभ मिळत राहिला आहे. संघाशी आपले जिव्हाळ्याचे नाते आहे. आपला हा लोभ असाच कायम रहावा !

आपणाला शतकोत्तर निरामय जीवन आणि उत्तम आयुरारोग्य लाभो ! परशुधारी आणि कोदंडधारी दोन्ही रामांची कृपादृष्टी आणि श्री महालक्ष्मीचे कृपाशीर्वाद सदोदित आपल्या पाठीशी राहोत!

# विशेष गौरव पुरस्कार



**माननीय डॉ. सुस्मिता मोहन गाडगीळ यांसी...**

आज कोल्हापूर चित्पावन संघातर्फे चाकोरीबाहेरी विशेष संशोधनासाठी आपला सन्मान करताना आम्हाला आनंद होत आहे !

करट, गळू आणि कुरुप यामुळे शरीरावर सूज असेल अशा जागी उगाळून लेप लावल्याने आजारापासून रुग्णाला मुक्त करणारी विनाशस्त्रक्रिया मोठ्या असलेल्या करटांपासून मुक्ती देणारी, संधिवातामुळे गुडघे आणि घोट्यावरील सूज कमी करणारी आणि अशा रुग्णांसाठी वरदान ठरणारी बहुगुणी लेपगोळी आपण आपल्या दीर्घ संशोधनातून तयार केली आणि या संशोधनाचे पेटंटही मिळविले.

दाढदुखीपासून संधिवात, गळू, करटापर्यंत सर्व प्रकारच्या वेदनेवर आराम आणि दिलासा देणाऱ्या या लेपगोळीसह सर्दीवरील प्रभावी कपाळलेप, खोकल्यावरील काढा अशी अनेक विकारांवरील रामबाण औषधे संशोधून आपण आपल्या वैद्यक क्षेत्रात मोलाची आणि लक्षणीय कामगिरी केली आहे.

या आपल्या संशोधन कार्याची दखल घेऊन आज कोल्हापूर चित्पावन संघातर्फे हा विशेष गौरव पुरस्कार आणि सन्मानपत्र देऊन आम्ही आपला आणि आपल्या संशोधन कार्याचा गौरव करीत आहोत.

आपणाला दीर्घायुरोग्य लाभो भगवान श्री परशुराम आणि श्री महालक्ष्मी वरदहस्त आपल्या पाठीशी राहोत आणि रुग्णांना रोगमुक्ती देणारे आपले संशोधन कार्य असेच अखंड सुरू राहो !

# गुरु पौर्णिमा अर्थात् व्यास पौर्णिमा

**पान १० वरून पुढे...**

उदाहरणार्थ तथाकथित विचारवंत राजसत्ते-समोर लाचार होणे आणि त्यांनी काही जुलुमी घटनांबाबत मौन बाळगणे (भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य). राजसत्ता अत्यंत उद्दाम आणि जुलुमी होणे (उदा. दुर्योधन, जरासंध, शिशुपाल, कंस, जयद्रथ). चांगले आणि वाईट यांचे मिश्रण असणे, किंवा उत्तम सद्गुण असून सुद्धा केवळ व्यक्तिगत महत्वाकांक्षा आणि मत्सर किंवा हेवा या दुर्गुणांमुळे व्यक्तीचा विनाश होणे (कर्ण).

अत्यंत मुत्सद्दी तरी सुद्धा समाजहितासाठी आणि न्यायासाठी दक्ष  असणे आणि न्यायाचा पक्ष घेणे, कैवार घेणे (भगवान श्री कृष्ण).

या महाभारतातील एक भाग असलेली भगवान कृष्णांनी सांगितलेली श्रीमद्भगवद्गीता ही तर साऱ्या मानवी जीवनातील सार सांगणारी असून मानवी जीवनातील कुठलाही प्रश्न असा नाही ज्याचे उत्तर या श्रीमद्भगवद्गीतेत नाही.

सर्वात शेवटी - अठरा पुराणांपैकी भागवत पुराणात सांगितलेली धर्माची तीस लक्षणे पाहिली तर ती आज सुद्धा लागू होतात.

सत्य, दया, तपश्चर्या, पावित्र्य, सहनशीलता, योग्यायोग्य विचार, मनाचा संयम, इंद्रियांचा निग्रह, अहिंसा, ब्रह्मचर्य, त्याग, स्वाध्याय, सरळपणा, संतोष, समदर्शित्व, महात्म्यांची सेवा, सांसारिक क्रियांपासून हळूहळू निवृत्ती, मनुष्याच्या अभिमानपूर्वक केलेल्या प्रयत्नांचे उलटेच फळ मिळते असा विचार, मौन, आत्मचिंतन, प्राण्यांना अन्न इत्यादींचे यथायोग्य वाटप, प्राण्यांमध्ये आणि विशेषेकरून मनुष्यांमध्ये आपला आत्मा आणि इष्टदेवतेचा भाव ठेवणे, संतांचे परम आश्रय भगवान श्रीकृष्ण यांची श्रवण, कीर्तन, स्मरण, सेवा, पूजा, नमस्कार, दास्य, सख्य आणि आत्मसमर्पण ही नवविधा भक्ती या तीस प्रकारांनी युक्त असे आचरण हाच सर्व माणसांचा परम धर्म आहे. याच्या पालनाने सर्वात्मा भगवंत प्रसन्न होतात.


हे सारे पाहिले की महर्षी व्यासांच्या बहुआयामी प्रतिभेसमोर केवळ नतमस्तक व्हावेसे वाटते.

आज व्यास पौर्णिमेच्या निमित्ताने महर्षी वेद व्यास यांना विनम्र अभिवादन.

**- आंतरजालावरून**

**दिनविशेष (ऑगस्ट २०२५)  विश्वावसूनाम संवत्सरे** **सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**श्रावण - भाद्रपद १९४७** **श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**शुक्रवार दि. १ :** लो. टिळक पुण्यतिथी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती, **शुक्रवार दि. ८ :** नारळी पौर्णिमा, **शनिवार दि. ९ :** रक्षाबंधन, ऑगस्ट क्रांतीदिन, **मंगळवार दि. १२ :** अंगारक संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.१३), संत बाळुमामा पुण्यतिथी, **बुधवार दि. १३ :** श्री टेंब्ये स्वामी जयंती, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी, **शुक्रवार दि. १५ :** भारतीय स्वातंत्र्यदिन, श्रीकृष्ण जन्माष्टमी, पारसी नूतन वर्ष प्रारंभ, **शनिवार दि. १६ :** गोपाळकाला, ज्ञानेश्वर माऊली जन्माष्टमी, **सोमवार दि. १८ :** श्रीकृष्ण सरस्वती महाराज पुण्यतिथी, **शुक्रवार दि. २२ :** दर्श पिठोरी अमावास्या, **मंगळवार दि. २६ :** हरितालिका तृतीया, **बुधवार दि. २७ :** श्री गणेश चतुर्थी, **गुरुवार दि. २८ :** श्री गजानन महाराज पुण्यतिथी, **शुक्रवार दि. २९ :** राष्ट्रीय क्रीडा दिन.

## हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ आणि पंचरत्न वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ब्राह्मण वधूवर विशेषांक प्रसिद्ध होणार !

हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ आणि महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि मध्य प्रदेश या राज्यात अनेक शाखांद्वारे लोकप्रिय असलेले वधूवर व पालकांच्या विश्वासास पात्र ठरलेले पंचरत्न वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळीच्या मुहूर्तावर वधूवर विशेषांक प्रसिद्ध होत आहे. हा अंक पुस्तक स्वरूपात ऑक्टोबर महिन्यात प्रसिद्ध होईल. अंदाजे शेकडो स्थळांबरोबरच विवाह विषयक अत्यंत उपयुक्त माहितीसह प्रसिद्ध होणारा हा संग्राह्य विशेषांक आहे. यामध्ये शेकडो स्थळांबरोबरच वधूवरांची माहिती त्यांच्या संपर्क फोनसहित देणार आहोत. ब्राह्मण पोटशाखेतील देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, सारस्वत, सीकेपी तसेच प्रथमवर, घटस्फोटीत, सापत्य, विधवा, विधूर अशा सर्व स्थळांची माहिती या अंकात मिळू शकणार आहे.

या विशेषांकात ज्या ब्राह्मण वधूवरांना आपली माहिती फोटोसह प्रसिद्ध करावयाची आहे, त्यांनी विजयादशमी, शनिवार, दि. 12 ऑक्टोबर 2025 पर्यंत त्यासाठी नाव नोंदणी करावी. कोल्हापूर चित्पावन संघ कार्यालय, 428, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर – 12, फोन नं. 0231–2546225, 2991673 आणि मोबाईल नं. 7620546225 किंवा पंचरत्नच्या पाच राज्यातील कोणत्याही शाखेमध्ये प्रत्यक्ष संपर्क साधून आजच आपली नोंदणी करावी. नोंदणी शुल्क रु. 500/– फक्त. पंचरत्नचा फोन क्र. 0231 – 2621001 आणि मोबाईल क्र. 9881291863 आहे. अंकाची किंमत रु. 200/– राहील. (कुरिअर चार्जेस वेगळे)

वधूवर अंकात नाव नोंदणी करताना शाखांमध्ये जाऊन विहित नमून्यातील फॉर्म भरावा. फोटो देताना अलिकडच्या काळातील फोटो द्यावा. फोटोला पीन मारू नये. फोटोमागे पूर्ण नाव लिहावे व फोटो चौकोनात चिकटवावा.

- ई–मेलवर नोंदणी करणाऱ्यांना – ज्या शहरात पंचरत्नची शाखा नाही त्या वधूवरांनी अंकातील फॉर्म सुवाच्च अक्षरात भरून स्कॅन करून पाठवावा. स्कॅन केलेला फॉर्म व रंगीत फोटो **panchratnakop@gmail.com** या पंचरत्नच्या ई–मेलवर स्वतंत्ररित्या पाठवावा. अथवा फॉर्म आणि फोटो 9881291863 या व्हॉटस्‌अप नंबरवर पाठवावा. फोटोखाली नाव लिहावे. फोटो पाठवताना तो स्वच्छ आणि व्यवस्थित पाठवावा. अस्वच्छ अथवा डाऊनलोड न झाल्यास फोटो येणार नाही. फक्त माहिती दिली जाईल याची नोंद घ्यावी. ई–मेल केल्यावर मुख्यालयात 0231 – 2621001 या नंबरवर सकाळी 11 ते सायंकाळी 6 पर्यंत कळवावे.
- नेटबँकिंग पेमेंट – ज्या शहरात पंचरत्नची शाखा नाही आणि ज्या वधूवरांना नेटवरून फॉर्म व फोटो पाठवायचे आहेत त्यांनी नेटबँकिंग मार्फत रक्कम भरून नाव नोंदणी करावी. त्यासाठी आयडीबीआय बँकेत 'पंचरत्न वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर' या नावे चालू खाते क्र. 463102000006248 (IFSC : IBKL0000463) या खात्यावर आपले पैसे जमा करावेत.
- फोटो व माहिती द्यावयाची असेल त्यांनी रु. 500/– वर दिलेल्या बँक खात्यात भरावेत.
- रक्कम भरल्यावर मुख्यालयात रक्कम भरल्याची तारीख कळवावी.

**आजच नाव नोंदणी करा आणि ऐन दिवाळीत विवाह योग जुळवून आणा.**

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027

SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.